नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज़

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २७५ Issue - 275 | वार मंगळवार दि. २४ फेब्रुवारी २०२६ Blow- Tuesday Date 24 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# न लाभलेला बेस्ट मुख्यमंत्री, अजित पवारांबद्दल बोलताना देवेंद्र फडणवीस हळहळले, अरव्खं सभागृह स्तब्ध!

## अजित दादांचं व्यक्तिमत्व हे केवळ एक व्यक्ती नव्हे तर एका पिढीचा विश्वास होते




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वक्तशीरपणा आणि घडाळ्याच्या काट्यावर चालणाऱ्या अजितदादांनी यावेळी मात्र टायमिंग चुकवलं. खऱ्या अर्थाने ज्यावेळी खूप मोठी इनिंग खेळतील असं सर्वांनाच दिसत होतं त्यावेळी मात्र अजितदादांनी (क्षळीं झ्रुरी) जीवनाच्या वेळेचं टायमिंग चुकवलं. अजितदादा सर्वाधिक ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिले आहेत. पण अनेकवेळा ते म्हणायचे कि मी कधीतरी मुख्यमंत्री होईल, मात्र यावेळी देखील उपमुख्यमंत्री मीच राहील, असेही ते गमतीने म्हणायचे. मात्र आज मी हक्काने म्हणू शकतो कि, 'अजितदादा पवार वॉज द बेस्ट चीफ मिनिस्टर महाराष्ट्र नेव्हर हॅड'

अजित दादांच्या रूपानं एक चांगला मुख्यमंत्री महाराष्ट्राला मिळू शकला असता, ते आता नसणार आहे. मला विश्वासही होता कि नियतीने त्यांना ती संधी दिली असती, ती समता त्यांच्यात होती. महाराष्ट्रात वसंतदादा आणि अजित दादा हे दोन दादा कायम महाराष्ट्राच्या स्मरणात राहील अशा शब्दात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (ऊर्शींशपवीर ऋव-परींळी) यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. आजपासून सुरु झालेल्या राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी दिवंगत सदस्यांना आदरांजली वाहण्यासाठी शोक प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. (चरहरीरिहींर वहळींशीहरप २०२६)

पोकळी या शब्दाची व्याप्ती काय असते हे आज मला कळतंय

पोकळी या शब्दाची व्याप्ती काय असते हे आज मला कळतंय, कारण असे अजित दादा पुन्हा होऊ शकत नाही. शिवाय हि पोकळीही कोणी भरून काढू शकत नाही. खऱ्या अर्थानं अजित दादांचा अकास्मात निधन हे सर्वांना धक्का देणारं आहे. सकाळी सहा वाजल्यापासून काम करणारा नेता अशी त्यांची ख्याती होती. प्रत्येक गोष्टीचं नियोजन, सखोल अभ्यास आणि सेकंदाचाही सदुपयोग करणारा नेता म्हणून अजित दादांकडे बघितलं जायचं. ते खऱ्या अर्थानं माझे दादाच होते. २०१४ नंतर आमची जावळीक झाली आणि ती जवळीक शेवटपर्यंत कायम राहिली. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

अजित दादांचं व्यक्तिमत्व हे केवळ एक व्यक्ती नव्हते तर एका पिढीचा विश्वास होते. त्यांच्या अपघाताची बातमी सर्वप्रथम आली तेव्हा असं वाटलं कि अपघात झाला असेल त्यात थोडंफार काही झालं असेल. मात्र नंतर दुसरी बातमी आली तेव्हा धक्काच बसला. मातीतून तयार झालेलं नेतृत्व अजित दादांचं होतं. ते कधीही कुणापुढे झुकले नाही. मात्र जेव्हा आपली चूक झाल्याचे लक्षात आलं तर ते जाहीर माफी मागायलाही डगमगले नाही, हे हि लक्ष्यात घेण्यासारखं होतं. अनेक टीका आणि विरोधाला समोर जावं लागलं असताना देखील त्यांनी संकटांना पाठ दाखवली नाही. त्यांच्या स्वभावात पारदर्शकता होती. शब्दाला, वेळेला जगणारा आणि एकवचनी अशी दादांची ओळख होती. असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# महाराष्ट्र होणाऱ्या कर्तबगार मुख्यमंत्र्याला मुकला : एकनाथ शिंदे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर आयोजित करण्यात आलेल्या मुंबईतील शोकसभेत भावना व्यक्त केल्या. अजित पवार यांना आदरांजली देण्याची अशी वेळ आपल्यावर इतक्या लवकर येईल असं स्वप्नात देखील वाटलं नव्हतं. अजित पवारांनी अनेक वर्ष काम केलं. १९९१ पासून ते काम करत होते. अजित पवार आमदार, मंत्री, विरोधी पक्षनेता, उपमुख्यमंत्री सुद्धा झाले. स्पष्टवक्ता आपली परखड मते मांडणरा नेता अजित पवार होते, अशा भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या.

एकनाथ शिंदे पुढं म्हणाले की अजितदादा काम होणार असेल तर हो म्हणणार, नसेल होणार तर नाही म्हणायचे. अजितदादांसारखा चटका लावून जाणारा नेता महाराष्ट्राने पाहिला. आमच्या तिघांच बॉंडिंग चांगलं होतं, आम्हाला एकमेकांच्या मनातलं कळायचं मात्र काळाच्या मनातले आम्ही ओळखू शकलो नाही. २८ जानेवारीला जी घटना घडली ती वेदनादायी आहे त्यामुळं महाराष्ट्र हळहळला.

कार्यकर्त्यांच्या पाठीशी कसं राहायचं ते त्यांच्याकडून शिकायचं. आम्ही कुठेही उद्घाटनाला गेलो तर तिथं वायर निघालेली दिसली तर काम व्यवस्थित कर असं ते सांगायचे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवताना ४६ हजार कोटी रुपये लागणार होते. मात्र दादांनी राज्याची आर्थिक घडी हालू दिली नाही, असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं.

**... असा माणूस पुन्हा होणे नाही, अजितदादा पुन्हा होऊ शकत नाहीत, अशी माणसं दुर्मिळ असतात : एकनाथ शिंदे**

आमच बॉंडिंग २४/७ होतं. ते पहाटे काम सुरु करायचे देवेंद्र फडणवीस दिवसभर काम करायचे तर मी रात्रभर काम करायचे. आम्ही समृद्धी उद्घाटनाला गेलो होती त्यावेळी देवेंद्र फडणवीस गाडी चालवत होते ते मागे बसले होते त्यांनी गाडीच स्पीड वाढवू दिलं नाही. सोबत म्हणाले होते की माझी बॅक सिट फिक्स आहे, अशी आठवण एकनाथ शिंदे यांनी सांगितली.

मला वडिलकीचा सल्ला द्यायचे. माझ्या पेक्षा ते मोठे होते. प्रशासनावर त्यांची चांगली पकड होती, असा माणूंस पुन्हा होणे नाही. पुन्हा अजितदादा होणे नाही, अशी माणसं दुर्मिळ आहेत, असंही एकनाथ शिंदे म्हणाले.

अजितदादांच्या मनात मुख्यमंत्री व्हाव असं होतं, नशिबाने साथ दिली असती तर नक्कीच ते देखील झालं असतं. ६ वेळा उपमुख्यमंत्री झाल्यावर कुणालाही ते वाटलं असतं. महाराष्ट्र एका होणाऱ्या कर्तबगार मुख्यमंत्र्याला मुकला, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

दु: ख काय असते ते मी पाहिलं आहे. माझी २ मुलं गेली, माझे गुरु आनंद दिघे अपघातात गेले त्यामुळे दु:ख पाहिलं आहे, मी दु:ख भोगलं आहे. दादांनी महाराष्ट्राला परिवार मानलं होतं. दादानी जे विचार केले होते ते पुढे आम्ही घेऊन जाऊ, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

# मंत्रालयातील लाचखोर राजू ढेरेंगेवर निलंबनाची कारवाई



मुंबई : मंत्री नरहरी झिरवळ यांच्या कार्यालयातील लाच प्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. लाच घेतलेल्या राजू ढेरेंगेला अखेर अन्न आणि औषध प्रशासन विभागातून निलंबित करण्यात आलं आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजू ढेरेंगेला विभागातून निलंबित करण्यात आलं आहे. अन्न आणि नागरी पुरवठा विभागातून राजू ढेरेंगे हा मंत्री आस्थापनेवर कार्यरत होता. या लाचखोरी प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांना क्लीन चिट दिली आहे.

नरहरी झिरवाळ यांचे खाजगी सचिव रामदास गाडे यांना या आधीच कार्यमुक्त करण्यात आलं आहे. त्यानंतर आता राजू ढेरेंगे याच्यावर विभागाने मोठी कारवाई करत त्याला निलंबित करण्यात आलं आहे. दरम्यान ३५ हजारांची लाच घेण्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या लिपिक राजेंद्र ढेरिंगेला जामीन मिळाला आहे. मुंबई सत्र न्यायालयातील एसीबीच्या विशेष न्यायालयाने ढेरिंगेला जामीन मंजूर केला.

मुख्यमंत्र्यांकडून क्लीन चिट

दरम्यान, लाचखोरी प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी मंत्री नरहरी झिरवाळ यांना क्लीन चिट दिली आहे. एसीबी कारवाई करण्यासाठी मुक्त आहे, परंतु मंत्र्यांच्या विरोधात कोणतेही पुरावे सापडले नाहीत. त्यामुळे मंत्री झिरवाळ यांचा यामध्ये कोणताही सहभाग नसल्याचं स्पष्ट होत आहे असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

अधिवेशनात मुद्दा गाजण्याची शक्यता

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तोंडावर औषध आणि प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या विभागातील लाचखोरीचे प्रकरण बाहेर आलं आहे. त्यांची आता चौकशी देखील सुरू आहे. सोमवारपासून सुरू होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात यावर गदारोळ होण्याची शक्यता आहे. मात्र आपल्या विभागातील अधिकाऱ्यांची होत असलेल्या चौकशीत सर्व काही निष्पण होईल, आपण सर्वांना उत्तर देण्यास तयार आहे असं मंत्री नरहरी झिरवाळ यांनी स्पष्ट केलं आहे.

झिरवाळांच्या खासगी सचिवावर कारवाई

अन्न आणि औषध प्रशासन विभागातील लाचखोरी प्रकरणात मंत्री नरहरी झिरवाळ यांचे खासगी सचिव रामदास गाडे यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे. झिरवाळ यांच्या खासगी सचिव रामदास गाडेंना अन्न आणि औषध प्रशासन विभागातून कार्यमुक्त करण्यात आलं आहे. वादग्रस्त अधिकारी रामदास गाडे यांना त्यांच्या मूळ आस्थापनेत म्हणजेच पशुवैद्यकीय विभागात पाठवण्याचे आदेश नरहरी झिरवळांनी दिले आहेत.

# नांदेड-लातूर महामार्गावर भीषण अपघात; ट्रकच्या धडकेत दहावीचा १७ वर्षीय विद्यार्थी जागीच ठार

नांदेड : नांदेड-लातूर राष्ट्रीय महामार्गावर खरबी फाटा येथे सोमवारी (२३ फेब्रुवारी) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात दहावीत शिकणाऱ्या १७ वर्षीय विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला. भागवत श्यामसुंदर शिंदे (रा. जानापुरी) असं मृत विद्यार्थ्याचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

भागवत शिंदे हा दुचाकीवरून घराकडे जात होता. खरबी फाट्यावरून जानापुरीकडे वळताना तो रस्ता ओलांडत असताना नांदेडकडून लातूरच्या दिशेने भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रकने त्याच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की भागवतचा जागीच मृत्यू झाला. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. मात्र गंभीर दुखापतीमुळे भागवतची प्राणज्योत मालवल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. अपघातानंतर महामार्गावरील वाहतूक काहीकाळ विस्कळीत झाली होती.

सध्या दहावीच्या बोर्डाच्या परीक्षा सुरू असून भागवतही परीक्षेला बसला होता. परीक्षा काळातच त्याच्यावर काळाने झडप घातल्याने त्याचे शैक्षणिक स्वप्न अपुरे राहिले. एका उमद्या विद्यार्थ्याच्या अकाली निधनाने जानापुरी गावावर आणि त्याच्या शाळेत शोककळा पसरली आहे. घटनेची माहिती मिळताच सोनखेड पोलीस ठाणे यांच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. पुढील तपास सुरू असून अपघाताची नेमकी कारणे शोधली जात आहेत.

**पिकं अक्षरशः झोपले, शेतकऱ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी** | **धाराशिव जिल्ह्यात पुढील २४ तासांत पावसाचा अंदाज**

# मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांना अवकाळीने झोडपले, अनेक राज्यांना अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे मराठवाड्यातील हवामानात बदल झाला आहे. सोमवारी पहाटे मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, हिंगोली, नांदेड, परभणी जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपले. बीडसह अन्य जिल्ह्यांत ढगाळ वातावरण होते. दरम्यान सोमवारी रात्री धाराशिवमध्ये पुन्हा पावसाने हजेरी लावली. लातूर जिल्ह्यात गारपीट झाल्याने पिकांचे नुकसान झाले. सोमवारी सकाळी धाराशिव शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाच्या सरी कोसळल्या. उमरगा तालुक्यातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली. त्याचा जनजीवनावर परिणाम दिसून आला.

धाराशिव जिल्ह्यात रब्बीची पिके काढणीच्या अवस्थेत आहेत. त्यात पावसाने हजेरी लावल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ढगाळ वातावरणामुळे कीड व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याची भीती आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार धाराशिव जिल्ह्यात पुढील २४ तासांत पावसाचा अंदाज वर्तविला आहे.

लातूर जिल्ह्यातील लातूर, रेणापूर, चाकूर तालुक्यात रविवारी मध्यरात्री व सोमवारी सकाळी पाऊस झाला. रेणापूर तालुक्यात सोमवारी दुपारी चार ते पाचच्या सुमारास गारपीट झाली. वाऱ्यामुळे काही ठिकाणी घरांवरील पत्रे उडून गेले. अवकाळी पावसाने गहू, हरभरा, ज्वारीचे काही प्रमाणात नुकसान झाले. परभणी शहरात गंगाखेड, पालम तालुक्यांतील काही



भागात सोमवारी दुपारी तीनच्या सुमारास वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. काढणीला आलेल्या रब्बी पिकांना मोठा फटका बसला आहे.

सोमवारी सकाळपासून कडक ऊन होते. दुपारी बारानंतर वातावरणात बदल झाल आणि तीनच्या सुमारास सोसाट्याच्या वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. परभणी जिल्ह्यातील आनंदवाडी, चाटोरी, बोरगाव, बंदरवाडी, खडी, नाव्हा, नाव्हलगाव, कांदलगाव या गावांना पावसाचा मोठा फटका बसला आहे. नांदेड, हिंगोली जिल्ह्यातही अवकाळी पावसाने हजेरी लावली. बीड जिल्ह्यात दिवसभर ढगाळ वातावरण होते. मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे.

दरम्यान, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे देशातील १० राज्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. फक्त पाऊसच नाही तर या राज्यांमध्ये वाऱ्याचा वेग हा प्रतीसात ३० ते ४० किमी असा असण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, झारखंड, सिक्कीम, आसाम, मेघालय, तेलंगणा या राज्यांना पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## संपादकीय....

### अवकाळीचा फटका

विदर्भासह मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये रविवारी रात्रीच्या सुमारास जोरदार पाऊस पडल्याची माहिती समोर आली आहे. विदर्भातील नागपूर, गोंदिया आणि भंडारासह मराठवाड्यातील बीड, लातूरसह धाराशिवमध्येही पावसाने दमदार बॅटिंग केल्याचे पाहायला मिळालंय. अवेळी पडलेल्या या विजांच्या कडकडाटासह पाऊसामुळे रब्बी हंगामातील काढणीला आलेल्या पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. परिणामी विदर्भ चिंता वाढली आहे. नागपुरात मध्यरात्री वादळी वाऱ्यासह जोराचा अवकाळी पाऊस झालाय. यामुळे अनेक सखल भागात पाणी साचल्याने दिसून आलं. तर काही ठिकाणी मोठी झाडं उन्मळून पडली. दुसरीकडे नागपूरच्या मनिष नगर परिसरातील अंडरपासमध्ये गुडगाभर पाणी साचले होते. त्यामुळे चाकरमान्यांना आज सकाळच्या सुमारास याच पाण्यातून मार्ग काढावा लागलाय. शिवाय यावेळी मोठ्या वाहतूक कोंडीचाही फटका सहन करावा लागला आहे. मनीषनगर प्रमाणे अशीच काहीशी परिस्थिती सोनेगाव, सोमलवाडा भागात पाहायला मिळाली आहे. दरम्यान नागपूर वेधशाळेने (छरसीिी खचऊ) दिलेल्या माहितीनुसार विदर्भात व मध्यभारताच्या वर तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे विदर्भात पुढची दोन दिवस अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. दुसरीकडे, लातूर शहरात मागील काही दिवसांपासून वाढलेल्या उकाड्यानंतर शहरासह परिसरात दिलासा देणारा पाऊस पडला आहे. मध्यरात्री सुमारे तीन वाजता शहरातील काही भागांत पावसाने हजेरी लावली. त्यानंतर सकाळी सहा ते सातच्या सुमारास राजीव गांधी चौक, उद्योग भवन, गरुड चौक या परिसरात पावसाने जोरदार बॅटिंग केली. मध्यरात्रीपासून सकाळपर्यंत शहराच्या विविध भागांत वेगवेगळ्या वेळेला पावसाच्या सरी कोसळल्याने काही काळासाठी रस्त्यांवर पाणी साचले. मात्र या जोरदार पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. धाराशिव जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी पहाटेच्या सुमारास झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांने काढून टाकलेल्या ज्वारीचे नुकसान झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून हवामानात अचानक बदल झाल्याने जिल्ह्यात काही ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस बरसला. शेतात काढून ठेवलेल्या ज्वारीवर पावसाचे पाणी साचल्याने ज्वारी काळी पडण्याची शक्यता आहे. तसेच हरभरा, द्राक्ष, आंबा, गहू या रब्बी हंगामातील पिकांनाही फटका बसण्याची मोठी शक्यता आहे. तर धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यात अवकाळी पावसाने चांगलीच हजेरी लावल्याने ज्वारी पिकाचे नुकसान पाहायला मिळत आहे. बीडच्या मांडेखेल शिवारात झालेल्या अवकाळी पावसामुळे ज्वारी पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. काल अचानक पावसामुळे ज्वारी पिकाला मोठा फटका बसला असून उभे पीक आडवे पडले, तसेच काही ठिकाणी कणसांना पाणी लागले आहे. यामुळे ज्वारीचे उत्पादन घटण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे तात्काळ पंचनामा करून तात्काळ आर्थिक मदतीची मागणी केली आहे.

# तो खूप चांगला होता हा पुरस्कार माणसाला मेल्याशिवाय भेटत नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माणूस जिवंत असताना त्याचं मोल कधीच कळत नाही, हे आपल्या समाजाचं सर्वात कडू आणि तितकंच सत्य चित्र आहे. एखादा माणूस आयुष्यभर प्रामाणिकपणे जगतो, लोकांसाठी धडपडतो, नात्यांसाठी झिजतो, कर्तव्य निभावतो पण त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप क्वचितच पडते. मात्र तोच माणूस या जगातून निघून गेल्यावर अचानक शब्दांचे पूर येतात तो खूप चांगला होता मनाने मोठा होता कधी कुणाला दुखावलं नाही आणि मग सुरू होतं स्तुतीचं अखंड कीर्तन. जिवंतपणी न मिळालेला सन्मान, मृत्यूनंतर पुष्पहारात गुंडाळून दिला जातो. हा विरोधाभास फक्त भावनिक नाही; तो सामाजिक मानसिकतेचा आरसा आहे. आपण जिवंत माणसाला गृहित धरतो. त्याची सवय होते. त्याची उपस्थिती इतकी नित्याची वाटू लागते की त्याचं असणं आपल्याला विशेष वाटेनासं होतं. घरात आई रोज जेवण करते, ते तिचं कर्तव्य मानलं जातं; वडील आयुष्यभर कष्ट करतात, ते त्यांचं काम समजलं जातं; मित्र संकटात धावून येतो, ते मैत्रीचं नातं म्हणून गृहित धरलं जातं. पण हे सगळं अचानक थांबलं, की त्याचं मूल्य जाणवतं. अनुपस्थितीचं वजन, उपस्थितीपेक्षा जड असतं.

समाजाचं कौतुकाचं गणितही विचित्र आहे. जिवंत असलेल्या व्यक्तीचं कौतुक केलं, तर तो डोक्यावर बसेल अशी भीती. त्याचं यश मान्य केलं, तर आपली किंमत कमी होईल अशी शंका. त्यामुळे आपण शब्द आवरतो, भावना दाबतो, आणि प्रशंसा पुढे ढकलतो. पण मृत्यू आल्यावर स्पर्धा संपते, तुलना संपते, अहंकार शांत होतो आणि मग मोकळेपणाने स्तुती केली जाते. कारण आता त्या व्यक्तीकडून आपल्याला काहीच धोका नसतो. कौतुक रोखून धरण्याची ही वृत्ती नात्यांना आतून पोखरते. ज्या घरात, ज्या कार्यालयात, ज्या समाजात परिश्रमाचं, प्रामाणिकपणाचं, संवेदनशीलतेचं त्वरित कौतुक होत नाही, तिथे हळहळू उत्साह मरतो. माणूस काम करतो, पण मनानं दूर जातो. तो हसतो पण आतून कोरडा होतो. कारण प्रत्येकाला पैशापेक्षा आधी शब्दांची गरज असते ती मान्यतेची, ओळखीची आणि आदराची.

आपण टीका करण्यामध्ये फार पुढे असतो; पण कौतुक करण्यात मागे पडतो. चूक दिसली की लगेच बोलतो हे काय केलंस?, तुझ्याकडून हे अपेक्षित नव्हतं. पण चांगलं काम दिसलं, की शांत राहतो. जणू काही चांगुलपणाला प्रतिसाद देणं बंधनकारक नाही. ही मानसिकता बदलण्याची वेळ आता निघून चालली आहे. मृत्यूनंतरचं कौतुक हा खरं तर आपल्या उशिरा जागे झालेल्या संवेदनांचा पुरावा असतो. अंत्यसंस्कारात उभा राहून आपण ज्या भावना व्यक्त करतो, त्या जर जिवंतपणी व्यक्त केल्या असत्या, तर कदाचित अनेक नाती अजून घट्ट राहिली असती. अनेक तुटलेली मनं वाचली असती. अनेक माणसं नैराश्याच्या कड्यावरून परत आली असती. आजच्या धावपळीच्या जगात माणूस सर्वात जास्त कशासाठी भुकेला आहे, तर तो आहे ओळखीच्या एका वाक्यासाठी. तू छान काम केलंस, तुझ्यामुळे फरक पडतो, तू आहेस म्हणून सोपं जातं ही वाक्यं औषधासारखी असतात. ती आत्मविश्वास वाढवतात. ती जगण्याची उर्मी देतात. आपण मात्र शब्द जपून ठेवतो जणू ते खर्चिक आहेत. पण खरे तर न बोललेले शब्दच सर्वात महाग पडतात. सोशल मीडियाच्या युगात हा विरोधाभास अधिक ठळक दिसतो. एखादी व्यक्ती जिवंत असताना तिच्या पोस्टवर दोन शब्द लिहायला लोक कंजूषी करतात. पण तीच व्यक्ती गेल्यावर लांबलचक पोस्ट, आठवणी, फोटो, भावनिक परिच्छेद सगळं ओसंडून वाहतं. हे प्रेम खरं असतं; पण उशिरा आलेलं असतं आणि उशिरा आलेल्या प्रेमाचं दुःख असं असतं की ते ज्याच्यासाठी असतं, त्याच्यापर्यंत पोहोचतच नाही.

आपण मुलांना शिकवतो, यशस्वी व्हा, मोठं व्हा, पुढे जा. पण आपण त्यांना हे शिकवत नाही की, जिवंत माणसाचं कौतुक करा. शाळेत गुणांना बक्षीस असतं; पण चांगल्या स्वभावाला किती वेळा दाद मिळते? कार्यालयात टार्गेट पूर्ण केल्यावर बोनस असतो; पण प्रामाणिक राहिल्याबद्दल किती वेळा अभिनंदन होतं? समाजात प्रसिद्धीला मान आहे पण शांतपणे काम करणाऱ्यांना किती वेळा व्यासपीठ मिळतं? माणूस मेल्यावर त्याला चांगला म्हणणं सोपं असतं; जिवंतपणी तू चांगला आहेस म्हणणं धैर्याचं असतं. कारण जिवंतपणी कौतुक केलं, तर आपल्याला स्वतःचा अहंकार बाजूला ठेवावा लागतो. दुसऱ्याचं मोठेपण मान्य करावं लागतं. आणि हे सगळ्यांना जमत नाही. नात्यांमधील अनेक दुरावे केवळ न बोललेल्या चांगल्या शब्दांमुळे निर्माण होतात. वडिलांनी मुलाचं कौतुक केलं नाही म्हणून मुलगा दूर जातो. पत्नीच्या कष्टांची दखल घेतली नाही म्हणून नातं कोरडं होतं. सहकाऱ्याच्या प्रामाणिक प्रयत्नांकडे दुर्लक्ष केलं म्हणून टीम तुटते. शब्द वाचवताना आपण माणसं गमावतो.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

आपल्या संस्कृतीत मृत व्यक्तीबद्दल वाईट बोलत नाहीत, अशी परंपरा आहे. ती योग्य आहे. पण मग जिवंत व्यक्तीबद्दल चांगलं बोलण्याची परंपरा का नाही? श्रद्धांजली सभा भव्य होतात; पण कृतज्ञता सभा का होत नाहीत? स्मारकं उभी राहतात; पण जिवंतपणी सन्मान का उभा राहत नाही? आपण मृत्यूला आदर देतो पण जीवनाला पुरेसा आदर देत नाही. खरं तर, जिवंतपणी दिलेलं कौतुक हीच खरी श्रद्धांजली असते, माणूस जिवंत असताना त्याच्या अस्तित्वाची दखल घेणं. त्याच्या कष्टांना मान देणं. त्याच्या चांगुलपणाला शब्द देणं. कारण शब्दांमध्ये ताकद असते ते तुटलेलं मन जोडू शकतात, थकलेला जीव उभा करू शकतात. आज समाजात मानसिक ताण, नैराश्य, एकटेपण वाढतंय. लोक बाहेरून मजबूत दिसतात; पण आतून तुटलेले असतात. अशा वेळी औषधांपेक्षा जास्त परिणामकारक असतात ते प्रामाणिक कौतुकाचे शब्द, मान्यतेचा स्पर्श आणि आदराची नजर. आपण हे बदलू शकतो आज, आत्ताच. कोणासाठी मोठा कार्यक्रम करण्याची गरज नाही. फक्त मनापासून बोलण्याची गरज आहे. आईला सांगा तुझ्यामुळे घर उभं आहे. वडिलांना सांगा तुमचा अभिमान वाटतो. मित्राला सांगा तू सोबत आहेस म्हणून धैर्य आहे. सहकाऱ्याला सांगा तुझं काम मोलाचं आहे. कौतुक म्हणजे चापलुसी नाही. कौतुक म्हणजे सत्याची कबुली.

चूक भूल देणे घेणे हा नियम आयुष्यात ज्यांना जमला त्यांना जीवन कळले असं मी म्हणेन. वाधीसाठी म्हैस मारणारी माणसं अनेक बघितली पण सगळ्या चुका पोटात घालणारी आईसारखी दुसरी व्यक्ती शोधून सापडणं कठीण आहे. माणसं समजून घ्यायला शिका. एक ताई बटाट्याची भाजी करण्यासाठी बटाटी कापत होती. अचानक तिला बटाट्याच्या वरिल बाजुला छिद्र पडलेले दिसले. तिने विचार केला की बटाटा खराब झाला आहे तो फेकून द्यावा, पण तिने तो फेकून न देता खराब झालेला तेव्हढा भाग कापून फेकून दिला. पुन्हा पाहिले असता अजून थोडा भाग खराब दिसला. तिने तो भागही कापून फेकून दिला. उरलेला बटाट्याचा अर्धा भाग कापून भाजीत टाकला. किती चांगली विचारसरणी आहे, ७० पैशांचा बटाटा आपण किती ध्यान देऊन कापतो. जो भाग खराब आहे तो कापून फेकून देतो. उरलेला भाग स्विकारतो. खुप चांगलं आहे हे. मात्र दुख या गोष्टीचं आहे की, आपण माणसाबाबत एव्हढे कठोर का वागतो? आपल्या जवळच्या एख्याद्या माणसाबाबत एक चुक दिसली तर त्याच्या पुर्ण व्यक्तीमत्वाला आपण कापून फेकून देतो. त्याच्या वर्षानुवर्षाच्या चांगल्या कामांकडे दुर्लक्ष करतो. आपण फक्त आपल्या अहंकारासाठी, मी पणासाठी त्याच्यासोबतचे प्रत्येक नाते तोडतो. मग एकच प्रश्न पडतो की, आपल्या जवळच्या माणसाची किंमत सत्तर पैशांच्या बटाट्यापेक्षाही कमी आहे का? या छोट्याशा गोष्टीचा जरूर विचार करा आणि आपल्या जवळच्या अमुल्य माणसांना लहान लहान चुकांसाठी जीवनातून वेगळे करु नका. माणूस म्हणुनी जन्मा आलो, माणूस म्हणुनी जगेल मी, हे तत्व अमलात आणा.

समाज अधिक संवेदनशील होईल, ते मोठ्या भाषणांनी नाही; तर छोट्या प्रामाणिक वाक्यांनी. माणूस जिवंत असताना त्याला तू चांगला आहेस असं ऐकायला मिळालं, तर मृत्यूनंतरच्या हजार वाक्यांची गरजच उरणार नाही. शेवटी प्रश्न एकच की, आपण पुष्पहार द्यायचा की शब्दहार? माणूस गेल्यावर तो खूप चांगला होता म्हणणं सोपं आहे. पण तो समोर उभा असताना तू खूप चांगला आहेस म्हणण्याचं धैर्य दाखवूया. कारण जिवंत माणसाला दिलेला सन्मान हाच खरा पुरस्कार असतो आणि तो मृत्यूनंतर नाही, तर आयुष्यभर मिळायला हवा.

# बँकेच्या नफ्यापेक्षा घोटाळ्याची रक्कम जास्त ; ५९० कोटींच्या फसवणूक प्रकरणी आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या चार अधिकाऱ्यांचे निलंबन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबईः आयडीएफसी फर्स्ट बँकेतील घोटाळा समोर आला. बँकेतील कर्मचाऱ्यांनी आणि हरियाणा सरकारच्या खात्यांमध्ये ५९० कोटींची फसवणूक केल्याची बँकेनं पोलिसात तक्रार दाखल केली. घोटाळा समोर येताच हरियाणा सरकारनं बँकेत होणारे सरकारी व्यवहार थांबविण्याचे निर्देश दिले आहेत.

आयडीएफसी फर्स्ट बँकेनं आरबीआयला बँकेतील फसवणुकीची माहिती दिली. तसेच बँकेनं पोलिसात तक्रार दाखल केली आहे. आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या एफआयआरमध्ये म्हटलं आहे की, चंदीगडमधील एका शाखेतील काही कर्मचाऱ्यांनी हरियाणा राज्य सरकारच्या काही खात्यांमध्ये अनधिकृत आणि फसव्या गोष्टी केल्या आहेत. यामध्ये इतर व्यक्ती, संस्था यांचा सहभागी असू शकतो. एकूण ५९० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज आहे. बँकेच्या तक्रारीनुसार हरियाणा सरकारचा एक विभाग आयडीएफसी फर्स्ट बँकेसोबत बँकिंग करत होता. कर्जदात्याला दुसऱ्या बँकेत खाते बंद करण्याची आणि शिल्लक हस्तांतरणाची विनंती मिळाली होती. या प्रक्रियेदरम्यान, खात्यातील शिल्लक आणि नमूद केलेल्या शिल्लकींमध्ये काही तफावत आढळून आली. १८ फेब्रुवारीपासून बँकेशी जोडलेल्या इतर हरियाणा सरकारी संस्थांच्या खात्यांमध्येही अशाच गोष्टी आढळून आल्या आहेत.

बँकेच्या चार अधिकाऱ्यांचे निलंबन– आयडीएफसी फर्स्ट बँकेनं म्हटलं आहे की, प्रारंभिक अंतर्गत पुनरावलोकन करण्यात आलं आहे. ही समस्या चंदीगडमधील त्या शाखेद्वारे चालवल्या जाणाऱ्या हरियाणा सरकारमधील सरकारशी जोडलेल्या खात्यांच्या विशिष्ट गटापुरती मर्यादित होती. आयडीएफसी फर्स्ट बँकेसाठी काम करणाऱ्या चार अधिकाऱ्यांना चौकशी होईपर्यंत निलंबित करण्यात आलं आहे. बँकेनं कर्मचाऱ्यांवर आणि इतर बाहेरील लोकांवर कठोर शिस्तभंगाची, दिवाणी आणि फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. शेअर बाजाराच्या एक्सचेंज फाइलिंगमध्ये म्हटलं आहे की, वैधानिक लेखापरीक्षकांना माहिती देण्यात आली आहे. बँकेकडून स्वतंत्र




बाह्य एजन्सीची नियुक्ती करून स्वतंत्र फॉरेन्सिक ऑडिटदेखील करण्यात येणार आहे.

ऑक्टोबर-डिसेंबरमध्ये बँकेला ५०३ कोटींचा नफा– शुक्रवारी बीएसईवर आयडीएफसी फर्स्ट बँकेचे शेअर्स ०.७२ टक्क्यांनी वाढून ८३.५६ रुपयांवर बंद झाले. तर बेंचमार्क ०.३८ टक्के वाढला. ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या तीन महिन्यांत बँकेच्या ठेवींमध्ये २४ टक्के वाढ झाली. यामध्ये चालू आणि बचत खात्यातील ठेवींच्या वाट्यामध्ये ३३ टक्के वाढ समाविष्ट आहे. ऑक्टोबर-डिसेंबर या कालावधीत निव्वळ नफा ४८ टक्क्यांनी वाढून ५०३ कोटी रुपये झाला आहे. आयडीएफसी फर्स्ट बँकेतील सुमारे ५९० कोटी रुपयांच्या फसवणुकीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर हरियाणा सरकारनं रविवारी आयडीएफसी फर्स्ट बँक आणि एयू स्मॉल फायनान्स बँकांना हरियाणामध्ये कोणत्याही सरकारी व्यवहार करण्यास मनाई करण्यात आली आहे.

# दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलकडून तमिळनाडूमधून सहा आतंकवाद्यांना अटक

नवी दिल्ली : दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलला मोठे यश मिळाले आहे. दिल्ली पोलीस स्पेशल सेलने तमिळनाडूमधून सहा संशयित आतंकवाद्यांना अटक केली आहे.

या व्यक्तींवर पाकिस्तानची गुप्तचर संस्था इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजेंस (आयएसआय) आणि बांगलादेशातील दहशतवादी संघटनांच्या सूचनेवरून भारतात मोठी दहशतवादी कटकारस्थानं रचल्याचा आरोप आहे. सर्व आरोपींना तमिळनाडूमधून दिल्लीला आणले जात आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये एका बांगलादेशी नागरिकाचाही समावेश आहे. संशयितांकडून काही आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले असून त्याची सखोल चौकशी सुरू आहे.

गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनंतर स्पेशल सेलने ही मोठी कारवाई केली. प्राथमिक चौकशीत असे समोर आले आहे की, हे संशयित भारतात मोठी घटना घडवून आणण्याच्या तयारीत होते. त्यांचे पाकिस्तानच्या आयएसआयशी संबंध असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. तसेच बांगलादेशातील दहशतवादी संघटनांच्या भूमिकेचाही तपास सुरू आहे. भारतातील शांतता भंग करणे आणि मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचवणे हा त्यांचा उद्देश होता. संशयितांकडून अनेक मोबाईल फोन आणि सिम कार्ड जप्त करण्यात आले आहेत. या उपकरणांचा वापर दहशतवादी संघटनांच्या समर्थनार्थ संदेश प्रसारित करण्यासाठी आणि संशयित हँडलर्सशी संपर्क ठेवण्यासाठी केला जात होता. जप्त केलेल्या मोबाईल आणि सिमकार्डची सखोल तपासणी करून त्यांच्या नेटवर्क, संपर्क आणि संपूर्ण कटकारस्थानाचा उलगडा करण्याचे काम सुरू आहे.

# भारताच्या डिजिटल कौशल्य मोहिमेला गती देण्यासाठी ‘बढना है तो यहाँ जुडना है’ या देशव्यापी मोहिमेचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताच्या डिजिटल कौशल्य परिसंस्थेला अधिक बळकट करण्यासाठी आणि 'विकसित भारत'च्या दिशेने प्रगतीचा वेग वाढवण्यासाठी, भारत सरकारचे कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) आणि शिक्षण राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६' या जागतिक कृत्रिम बुद्धिमत्ता परिषदेच्या निमित्ताने ''बढना है तो यहाँ जुडना है'' (प्रगतीसाठी सहभाग) या देशव्यापी जनजागृती मोहिमेचा शुभारंभ केला.

या देशव्यापी मोहिमेचा भाग म्हणून दिग्गज अभिनेते अमिताभ बच्चन यांना या मोहिमेत सहभागी करून घेण्यात आले आहे. त्यांची चिरंतन लोकप्रियता आणि जनमानसातील दांडगा प्रभाव यामुळे कौशल्य, रोजगार आणि आजीवन शिक्षणासाठी असलेल्या भारताच्या एकात्मिक डिजिटल व्यासपीठ म्हणजेच 'कौशल्य भारत डिजिटल हब' (स्कील इंडिया डिजिटल हब- एस आय डी एच) बद्दलची जागृती आणि त्यातील लोकांचा सहभाग अधिक वाढेल, अशी अपेक्षा आहे.

या मोहिमेचे उद्दिष्ट 'एस आय डी एच' ची पोहोच अधिक विस्तारणे हे आहे. या व्यासपीठावर आधीच १.५ कोटींहून अधिक उमेदवारांची नोंदणी झाली असून, हे देशातील सर्वात मोठ्या एकीकृत डिजिटल कौशल्य व्यासपीठांपैकी एक म्हणून उदयास आले आहे. भारत ज्या वेगाने 'विकसित भारत'च्या दिशेने वाटचाल करत आहे आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), ऑटोमेशन (यंत्र स्वयंचलन)आणि डिजिटल नवोन्मेषांच्या बदलांना सामोरे जात आहे, त्या काळात नागरिकांना त्यांचे कौशल्य अद्ययावत करण्यासाठी, नवीन कौशल्ये आत्मसात करत राहण्यासाठी, आणि भविष्याच्या दृष्टीने त्यांची व्यावसायिक कारकीर्द सुरक्षित करण्यासाठी 'एस आय डी एच' हे एक मुख्य इंजिन म्हणून काम करत आहे.

या शुभारंभ प्रसंगी बोलताना जयंत चौधरी म्हणाले, ''भारताच्या डिजिटल सामर्थ्याला, 'इंडिया स्टॅक' आणि आता 'कौशल्य भारत डिजिटल हब' सारख्या क्रांतिकारक उपक्रमांमुळे, जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. या व्यासपीठांनी सार्वजनिक सेवा आणि कौशल्य विकासाची दारे अभूतपूर्व प्रमाणात सर्वांसाठी खुली केली आहेत.''

एआय आणि ऑटोमेशनच्या युगात, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा कशा प्रकारे जीवनभराच्या शिक्षणाला आणि प्रत्यक्ष आर्थिक संधी निर्माण करण्याला बळ देऊ शकतात याचे उदाहरण म्हणून एसआयडीएच-सिध कडे पाहाता येईल. 'बढना हैं तो यहां जुडना हैं' मोहिमेद्वारे आम्ही प्रत्येक भारतीयाला या परिसंस्थेशी जोडू इच्छितो आणि विकासाच्या प्रवासात पुढचे पाऊल उचलण्यासाठी आमंत्रित करत आहोत.

पहिल्यांदा मोबाईलसाठी, एआय सक्षम व्यासपीठ असलेल्या सिध अनेक सरकारी कौशल्य उपक्रमांना एकत्रित करते आणि उद्योगांशी निगडित आणि भविष्यवेधी तयार अभ्यासक्रम पुरवते आणि विद्यार्थ्यांची रुची आणि करिअर उद्दिष्टांवर आधारित वैयक्तिक शिफारसीदेखील प्रदान करते. या व्यासपीठामध्ये एलएमएस सक्षम केंद्रीय शिक्षण केंद्र, डिजिटल पद्धतीने सत्यापित, क्यूआर कोड सक्षम वैयक्तिक डिजिटल स्वरुपातील सीव्ही, आधार आधारित ई केवायसी नोंदणी, ओटीपी आधारित मोबाईल प्रवेश आणि २१ भारतीय भाषांमध्ये उपलब्धता आहे, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात समावेशन आणि प्रवेश सुलभता सुनिश्चित होते.

सिधच्या माध्यमातून विविध प्रकारच्या वापरकर्त्यांना सेवा प्राप्त होते- करिअरच्या वाटा शोधणाऱ्या विद्यार्थ्यांपासून ते कार्यबल म्हणून प्रवेश करू इच्छिणाऱ्या पदवीधारकांपर्यंत, आपल्या कौशल्यांना अद्ययावत करू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांपासून ते भविष्यातील उगवत्या उद्योजकांपर्यंत सर्वांना ही सेवा मिळते. वेगवेगळी कौशल्ये आणि रोजगाराचे स्रोत यांना एकाच मंचावर आणत सिध ने प्रवेश, माहिती, भाषा आणि विश्वासार्हता यांचे अडथळे दूर केले आहेत आणि संधींचे लोकशाहीकरण केले आहे. 'बढना है तो यहां जुडना हैं' मोहीम डिजिटल व्यासपीठ, समाज माध्यमांवरील वाहिन्या, ॲप परिसंस्था आणि क्यूआर सक्षम संवाद यांवर सुरू होईएल जेणेकरून अडथळ्याविना आणि त्वरित नोंदणी शक्य होणार आहे. या मोहिमेचे चित्र भारताच्या विविधतेतवर प्रकाश टाकते- तरुण, महिला, व्यावसायिक, उद्योजक आणि दिव्यांग नागरिक असो विकास आणि संधी प्रत्येकासाठी असल्याचा संदेश अधोरेखित करते.

समृद्धीसाठी आजीवन शिक्षणाच्या दृष्टीकोनात कोणासाठी, कधीही, कुठेही भविष्यासाठी कार्यबल सज्ज करण्यासाठी आणि जागतिक कौशल्य भांडवल म्हणून भारताचे स्थान बळकट करण्यासाठी सरकारच्या वचनबद्धतेचे प्रतिनिधित्व करते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# उगाव येथील युवकाचा परसूल शिवारात पुलाखाली संशयास्पद अवस्थेत मृतदेह; घातपाताचा संशय



## तातडीच्या चौकशीसाठी निफाडला मुस्लिम बांधवांचा भव्य मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड - निफाड मार्गावरील परसुली चिंचोली नदीच्या पुलाखाली पाण्यात काल एका तरुणाचा संशयास्पद अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. हा मृतदेह उगाव येथील शादाब रज्जाक तांबोळी (वय ३०) यांचा असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, या घटनेत घातपाताचा संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाच्या तातडीच्या चौकशीसाठी निफाड येथे मुस्लिम समाज बांधवांनी भव्य मोर्चा काढून दोषींना तत्काळ अटक करण्याची मागणी केली.

परसुल शिवारात दि.२२ फ ेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी सुम ारे ९ वाजेच्या सुमारास स्थानिक नागरिकांना पुलाखाली पाण्यात मृतदेह दिसून आला. माहिती मि ळताच चांदवड पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले व स्थानिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला. पोलिसांनी केलेल्या पाहणीत मृताच्या दोन्ही हातांना नायलॉन दोरीने बांधून मांडीला आवळलेले होते. तसेच कमरेला अंदाजे २० ते ३० किलो वजनाचे डंबेल्स बांधलेले व तोंड कपड्याने घट्ट बांधलेले असल्याचे आढळले. मृताच्या अंगावर लाल रंगाचा हुडी टी-शर्ट, निळ्या रंगाची ट्रॅक पँट आणि पायात ९ नंबरची पॅरॉगॉन कंपनीची चप्पल होती. प्राथमिक तपासात मृतदेहाची ओळख पटविताना तो उगाव येथील शादाब तांबोळी यांचा असल्याचे स्पष्ट झाले. शादाब तांबोळी हे दिनांक १८ फेब्रुवारीपासून बेपत्ता असल्याची नोंद निफाड पो- लीस ठाण्यात करण्यात आली होती. त्यामुळे सदर मृत्यू नैसर्गिक नसून घातपाताचा असल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे.

घटनेची माहिती मिळताच निफाड पोलिसांनी देखील घटनास्थळी दाखल होत तपास सुरू केला. घटनास्थळ पंचनामा, वैद्यकीय तपासणी तसेच तांत्रिक पुरावे संकलित करण्याचे काम सुरू असून वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली चांदवड व निफाड पोलीस संयुक्तरीत्या तपास करीत आहेत.

दरम्यान, उगाव येथे संतापाचे वातावरण असून प्रकरणाचा लवकरात लवकर उलगडा करावा, अशी म ागणी नातेवाईक व नागरिकांकडून होत आहे. या प्रकरणाचा तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी आज (दि. २३) निफाड येथे मुस्लिम समाज बांधवांनी भव्य मोर्चा काढत पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना निवेदन दिले. मोर्चातून कारवाईची मागणी करण्यात आली.

# पडघे विभागात दहावीची परीक्षा सुरळीत सुरू; चार केंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव :

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या वतीने घेण्यात येणारी इयत्ता दहा- वीची परीक्षा दिनांक २० फेब्रुवारी २०२६ पासून राज्यभर सुरू झाली असून भिवंडी तालुक्यातील पडघे विभागात परीक्षा शांततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडत आहे. विभागातील चार परीक्षा केंद्रांवर एकूण ७५७ विद्यार्थी परी- क्षेला बसले असून पहिल्याच दिवशी मराठी विषयाचा पेपर कोणताही अनुचित प्रकार न घडता सुरळीत पार पडला. पडघे विभागातील शारदा विद्यालय पडघे, आर. के. पालवी इंग्रजी शाळा, टी. ए. पाटील इंग्रजी शाळा आणि के. एम. ई. एस. उर्दू हायस्कूल या चार केंद्रांवर परीक्षा सुरू आहे. त्यापैकी आर. के. पालवी इंग्रजी शाळेत २३२ विद्यार्थी, शारदा विद्यालयात २०० विद्यार्थी, टी. ए. पाटील इंग्रजी शाळेत १७५ विद्यार्थी आणि के. एम. ई. एस. उर्दू हायस्कूलमध्ये १५० विद्यार्थी परीक्षा देत आहेत. परीक्षेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचे मनोबल उंचावण्यासाठी अनेक पालकांनी परीक्षा केंद्राबाहेर उपस्थिती लावली होती. विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. कॉपीमुक्त अभियानाच्या पार्श्वभूमीवर पडघा विभागातील चारही परीक्षा केंद्रांवर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. कोणतेही अनुचित प्रकार घडू नयेत यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाकडून विशेष दक्षता घेण्यात येत आहे. जिल्ह्यातील अतिसंवेदनशील व संवेदनशील केंद्रांची माहिती संकलित करून त्यानुसार खबरदारीचे उपाय अमलात आणण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाची असलेली ही परीक्षा १८ मार्च २०२६ पर्यंत सुरू राहणार असून या कालावधीत कडक सुरक्षा व्यवस्था कायम ठेवण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

एकूणच, पडघा विभागात दहावीची परीक्षा शांत, सुरक्षित आणि नियोजनबद्ध वातावरणात सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# बसवेश्वराचे जागतिक स्मारक उभारा, मंगळवेढ्याचा विकासाचा मार्ग मोकळा करा!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मंगळवेढा हे संतांची पावन भूमी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाते. भूमी म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळखले जाते संत दामाजी, संत चोखामेळा, संत कान्होपात्रा, यासारख्या अनेक थोर संतांच्या पावलाने पाहून पावले- ले या नगरीला महात्मा बसवेश्वरांच्या ऐतिहासिक कार्याची ही समृद्धी परंपरा लाभलेली आहे. परंतु आजही त्यांच्या कार्याची भव्य आणि जागतिक स्तरा- वर ओळख निर्माण करणारे स्मारक मंगळवेढ्यात उभे राहिलेले नाही, ही बाब घेत जनक असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे, इतिहास साक्षी आहे की, महात्मा बसवेश्वरांनी सामाजिक समतेचा, स्त्री-पुरुष समान- तेचा, सम संस्कृतीचा आणि अंधश्रद्धे विरोधी विचारांचा जॉज्वल्य संदेश दिला. त्याच्या क्रांतिकारी विचारांनी समाज व्यवस्थेला नवीन दिशा दिली.

### संत भूमीच्या अस्मितेसाठी ठाम मागणी, जनतेतून तीव्र भावना व्यक्त

अशा महापुरुषांच्या कार्याची केंद्रस्थान ठरू शकणारी मंगळवेढा आजही दुर्लक्षित का? असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे.

स्थानिक नागरिक, विविध सामाजिक संघटना आणि बसवेश्वर अनुयायी यांची एक मुखी मागणी आहे की, मंगळवेढा येथे महात्मा बसवेश्वरांची जागतिक दर्जाची भव्य स्मारक उभारण्यात यावे. या स्मारकात त्यांच्या जीवनपट, विचारधारा, ग्रंथसंपदा संशोधन केंद्र, संग्रहालय आणि अभ्यासिका यांचा समावेश असावा, जेणेकरून देश विदेशा- तील अभ्यासक आणि पर्यटक येथे आकर्षित होतील.

तज्ज्ञांच्या मते, असे स्मारक उभारल्यास मंगळवेढ्याच्या पर्यटनाला मोठी चालना मिळेल. स्थानिक रोजगार निर्मिती,पायाभूत सुविधा विकास आणि सांस्कृतिक अभिमान यांना नवी बळ मिळेल व संत भूमीच्या सर्वांगीण विकास साधण्यासाठी हे पाऊल अत्यंत म हत्त्वाची ठरेल.

सध्या राज्य व केंद्र सरकारकडून विविध ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी निधी उपलब्ध केला जात आहे. अशाच परिस्थितीत मंगळवे ला न्याय मिळवून देणार का? लोकप्रतिनिधींनी याबाबत पुढाकार घेऊन ठोस प्रस्ताव सादर करावा, अशी मागणी तीव्र होत आहे.

महत्व बसवेश्वरांचे विचार केवळग्रंथात नको तर भव्य स्म रकातून जगासमोर यावेतअशी भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे मंगळवेढ्याच्या परंपरेचा सन्मान राखण्यासाठी आणि विकासाचा नवा अध्याय लिहिण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी म्हणून खासदार प्रणिती शिंदे, आमदार समाधान आवताडे यांनी पुढाकार घेणार का?

# ईदगाह मैदाना ची जागा उपलब्ध करून द्यावी : महाविकास आघाडीची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : कळंब नगर परिषदेच्या अध्यक्षा सौ. सुनंदा शिवाजी कापसे व मुख्याधिकारी सौ. मंजूषा गुरमे यांची भेट घेऊन महाविकास आघाडीच्या सर्व सदस्यांनी ईदगाह मैदाना संदर्भात निवेदन दिले.

यात नमूद केल्याप्रमाणे दिनांक २२ जूलै २०२१ रोजी संजय मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वसाधारण सभेत ठराव क्रमांक ४९० नुसार सर्व्हे क्रमांक ७ मध्ये ईदगाह मैदानासाठी जागा निश्चित केली आहे. सदर जागेबाबत काही आक्षेप येऊ नये म्हणून नंतरच्या काळात भूमी अभिलेख विभागाच्या कडून मोजणी करून चतुर्सीमा निश्चित करण्यात आली. सदर जागा प्रशासक कालखंडात उपयोगात आणली गेली नाही. परंतु सध्या रमजानचा पवित्र महिना असून मुस्लिम समाजातील लोकांना ईद दिवशी येथे नमाज पठण करता म्हणून सदर जागा स्वच्छ करून व संबंधित समाजातील मौलाना व मौलवी यांना बोलावून सदर जागा आगामी ईद पूर्वी उपलब्ध व्ह- ावी म्हणून विनंती करण्यात आली. नगराध्यक्ष व मुख्याधिकारी दोघेही धार्मिक व्यक्तीमत्वाचे असल्याने ते हा विषय तात्काळ मार्गी लावतील असा विश्वास निवेदकांनी व्यक्त केला.

निवेदन देताना संजय मुंदडा, सागर मुंडे, जमील कुरेशी, रुखसाना बागवान, सफूरा काझी, सौ.अर्चना मोरे, सौ. आशा भवर, सौ. ज्योती हारकर, सौ. वनमाला वाघमारे उप- स्थित होते.



# कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षणासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सोलापूर जिल्ह्यातील सर्व पशुपालक, शेतकरी, व सुशिक्षित बेरोजगार यांनी पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूरच्या वतीने सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे ५ दिवसाचे कुक्कुटपालन व्यवसाय प्रशिक्षण आयोजित केले आहे असून दि. ०९ मार्च २०२६ ते १३ मार्च २०२६ पर्यंत प्रशिक्षण कालावधी आहे. तरी प्रवेश घेऊ इच्छीत असलेल्यांनी दि. २४ फेब्रुवारी २०२६ ते ०६ मार्च २०२६ पर्यंत अर्ज स्वीकारले जातील. तरी याचा लाभ घ्यावा. सदर प्रशिक्षानार्थ्याची शैक्षणिक पात्रता किमान इ.७ वी पास असणे अपेक्षित आहे. तसेच सदर प्रशिक्षण सुशिक्षित बेरोजगारांना सुवर्ण संधी आहे. सदर प्रशिक्षणासाठी प्रवेश फी सर्व प्रवर्गासाठी २००/- रुपये आकारण्यात येईल. सोबत शाळा सोडण्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, गुणपत्रक व पासप- ोर्ट फोटो जोडणे आवश्यक आहे. असे आवाहन डॉ. ए. एस. तांबे, जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सोलापूर यांनी केले आहे. तर सदर प्रशिक्षणासाठी संपर्क डॉ. स्नेहंका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी गट-अ, सघन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, बी.पी.एड. कॉलेजजवळ, सोल- ापूर येथे साधावा असे आवाहन जिल्हा उपायुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय जिल्हा परिषद, सोलापूर यांनी केले आहे

**दोन्ही गटाच्या नगरसेवकांनी नोंदवला सक्रिय सहभाग**

**हजारो युवक कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्तपणे नोंदविला सहभाग**

# संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त पंढरपूर नगरपालिका प्रशासनाच्या वतीने महास्वच्छता अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी

संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून पंढरपूर नगरपालिकेच्या वतीने महास्वच्छता अभियानाच्या आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पंढरपूर शहरातील विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आले झाडू संतांचे मार्ग करू पंढरीचे स्वर्ग हे ब्रीदवाक्य घेऊन स्वच्छ आणि सुंदर पंढरपूर ही मोहीम यशस्वी करण्याकरिता पंढरपूर नगरपालिकेतील लोकनियुक्त नगराध्यक्ष तसेच नगरपालिकेतील सर्व नगरसेवक सत्ताधारी आणि विरोधी गटाचे नगरसेवक स्वीकृत नगरसेवक यांनी एकत्र येऊन स्वच्छता मोहीम यशस्वी केली.

विविध राजकीय पक्षाच्या वतीने गेल्या अनेक दिवसांपासून पंढरपूरमध्ये विविध भागात स्वच्छता मोहीम राबवली जात आहे. त्यामुळे पंढरपूर शहरातील विविध रस्त्यांना स्वच्छतेचे स्वरूप आले आहे त्यामुळे सर्वसामान्य पंढरपुरांमधून या मोहिमेची कौतुक केली जात आहे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीच्या अवचित्य साधून राबवण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेमध्ये पंढरपूर नगरपालिकेतील तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नगराध्यक्ष, नगरसेवक तसेच भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीचे नगरसेवक यांनी सहभाग होऊन स्वच्छता मोहीम यशस्वी करण्याकरिता सक्रिय सहभाग नोंदविला.

या उपक्रमाचे सर्व सामान्य नागरिकांमधून कौतुक केले जात आहे. स्वच्छता मोहिमेकरता सत्ताधारी व विरोधी गट एकत्र येऊन स्वच्छता म ोहीम राबवून लागल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमधून दोन्ही गटाचे कौतुक केले जात आहे गेल्या काही दिवसापू- र्वी पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर पंडिता ताई भालके यांनी पद्मावती उद्यान परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेतली होती. त्यानंतर माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी आपल्या सर्व नगरसेवकांसोबत घेत पंढरपूर शहरातील अवस्थेचा विषय असलेल्या चंद्रभागा नदीच्या स्वच्छतेची मोहीम हाती घेतली होती.

त्यानंतर पंढरपूर नगरपालिका प्रशासनाच्या वतीने आज संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून स्वच्छता मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेमध्ये पंढरपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष,



उपनगराध्यक्ष, व सर्व नगरसेवक नगरसेविका, नगरपालिकेचे कर्मचारी अधिकारी तसेच सफाई कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदवत पंढरपूर शहरा- तील विविध भागांमध्ये स्वच्छता मोहीम राबवली आहे.

पंढरपूर शहरात संत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे निमित्त नगरपालिकेच्या



प्रशासनाच्या वतीने राबवण्यात आलेल्या या स्वच्छता मोहिमेचे सर्व सरातून कौतुक केले जात आहे अशीच मोहीम सातत्याने पंढरपूर शहरात राबवली गेल्यास. पंढरपूर शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मिटण्यास मदत होईल असा पंढरपूर शहरातील जाणकाराकडून व्यक्त केला जात आहे.

# अंधश्रद्धा दूर करण्यासाठी गाडगेबाबांनी सातत्याने परिश्रम घेतले.: डॉ. पी.आर. कुलकर्णी

## स्वेरीमध्ये 'संत गाडगेबाबांची १५० वी जयंती' साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'महाराष्ट्राला अनेक थोर संतांची परंपरा लाभलेली आहे. त्यामुळे राज्याला संतांची भूमी असे म्हटले जाते. या ठिकाणी अनेक संत होवून गेले त्यापैकीच एक महान संत म्हणजे संत गाडगे महाराज होय. रंजल्या- गांजलेल्यांची सेवा हीच गाडगेबाबांची देवपूजा असायची. अंधश्रद्धा दूर करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.' असे स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे वरिष्ठ प्रा. डॉ. पी.आर. कुलकर्णी यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्युट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा यांची १५० वी जयंती साजरी करण्यात आली. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली याचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे वरिष्ठ प्रा. डॉ. पी.आर. कुलकर्णी हे मार्गदर्शन करत होते. प्रारंभी संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी मार्गदर्शन करताना पुढे डॉ. पी. आर. कुलकर्णी म्हणाले की, 'गाडगे बाबा' यांचे पूर्ण नाव डेबूजी झिंगराजी जानोरकर हे होते. पण नागरिक त्यांना त्यांच्या कार्यामुळे आणि समाजसेवेमुळे 'गाडगे बाबा' म्हणून ओळखू लागले. गाडगेबाबांना एक कीर्तनकार, संत आणि समाजसुधारक अशी स्वतंत्र ओळख निर्माण झाली. अत्यंत साधेपणा, गरिबी, अंगावर फाटके तुटके परंतु स्वच्छ असणारे कपडे असे गाडगे बाबांचे राहणीमान होते. गाडगे बाबांना सामाजिक न्याय, सुधारणा आणि स्वच्छता या विषयांत जास्त आवड होती. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांना भेटी देत असत. अनाथ, अपंग, दरिद्री व दुःखी लोक हेच त्यांचे दैवत होते.' असे सांगून डॉ. कुलकर्णी यांनी संत गाडगेबाबा यांच्या जीवनकार्याचे महत्व सांगून समाजाच्या हितासाठी त्यांनी केलेल्या कार्यावर प्रकाश टाकला.

यावेळी विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अमोल चौंडे यांच्यासह सर्व अधिष्ठाता, पाचही विभागांचे विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी आदी उपस्थित होते. डॉ. नीता तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# विविध कृषी पुरस्कारांसाठी शेतकऱ्यांनी ऑनलाईन अर्ज करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महाराष्ट्र राज्य हे कृषि उत्पादन व कृषि उद्योग क्षेत्रात देशात अग्रगण्य राज्य म्हणून ओळखले जाते. राज्यामध्ये दरवर्षी शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा सन्मान महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत करण्यात येतो. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार इत्यादी पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते प्रदान करून संबंधितांना सन्मानित करण्यात येते.

यापूर्वी विविध कृषी पुरस्कारांचे प्रस्ताव चार प्रतींमध्ये ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येत होते. प्रस्ताव बनविण्यासाठी खर्च येत असल्याने सर्व इच्छुक शेतकरी अर्ज करू शकत नव्हते. या पारंपारिक पद्धतीमुळे प्रस्ताव सादरीकरण, पडताळणी व संकलनासाठी अधिक कालावधी लागत होता. या पार्श्वभूमीवर पुरस्कार प्रस्तावांची प्रक्रिया अधिक सुलभ, वेळबद्ध, पारदर्शक व प्रभावी करण्याच्या दृष्टीने कृषी विभागामार्फत पुरस्कार प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात स्वीकारण्यासाठी स्वतंत्र संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. सदर प्रणाली कृषी विभागाच्या संकेतस्थळावर (https://krishi.maharashtra.gov.in) कृषी पुरस्कार टॅब मध्ये उपलब्ध आहे.

सदर संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून पुरस्कार प्रस्ताव सादरीकरण, तपासणी, मूल्यांकन तसेच अहवाल निर्मिती ही संपूर्ण प्रक्रिया डिजिटल स्वरूपात राबविणे शक्य होणार आहे. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन पारदर्शकता वाढणार असून पुरस्कार प्रक्रियेची कार्यक्षमता, विश्वासार्हता व परिणामकारकता अधिक बळकट होणार आहे. तसेच शेतकऱ्यांना खालीलप्रमाणे फायदा होणार आहे.

■ ऑनलाईन प्रणालीमुळे शेतकऱ्यांना घरबसल्या अर्ज सादर करता येणार.

■ ऑफलाईन चार प्रतींमधील प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणारा वेळ व खर्च वाचून प्रस्ताव सादरीकरण जलद गतीने होणार आहे.

■ एकदाच अपलोड केलेली कागदपत्रे पुन्हा-पुन्हा देण्याची आवश्यकता नाही.

■ अर्ज कुठल्या टप्प्यावर आहे याची माहिती शेतकऱ्यांना सहज मिळणार आहे.

■ छपाई, झेरॉक्स, प्रवास व पोस्ट खर्च कमी होणार असून आर्थिक भार कमी होणार आहे.

मा.आयुक्त कृषी यांनी इच्छुक शेतकरी/व्यक्ती/संस्था/गट यांना सन २०२५ पासूनचे विविध कृषी पुरस्कार बाबतचे अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करणेबाबत आवाहन केले आहे. तरी इच्छुक शेतकऱ्यांनी तात्काळ आपला अर्ज ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे सादर करावा. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# नळदुर्ग बसस्थानकासाठी २४ तास वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करावी व या बस स्थानकावर आगाऊ आरक्षणाची सोय करावी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरीलएस. के. गायकवाड : धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर आगार अंतर्गत येणाऱ्या नळदुर्ग बस स्थानकावर २४ तास वाहतूक नियंत्रकाची नेमणूक करावी व या बस स्थानकात आगाऊ आरक्षणाची सोय तात्काळ करावी अशी मागणी भारतीय जनता पार्टी मीडिया सेलचे तुळजापूर तालुका अध्यक्ष किशोर धुमाळ वागदरीकर सह प्रवासी ग्रामस्थानी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

वाहतूक नियंत्रण धाराशिव बस स्थानक,जिल्हा धाराशिव यांना दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की तुळजापूर आगार अंतर्गत येणारे नळदुर्ग बस स्थानक हे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६५ (पूर्वीचा ९) लगत असून महाराष्ट्रातच नव्हे तर देशात कुठेही जायचे असेल तर याचं बस स्थानकावर ग्रामीण भागातील प्रवाशांना यावे लागते.

त्यामुळे या बसस्थानकावर नेहमीच प्रवाशांची वर्दळ असते. दिवसभर या बस स्थानकावरून मोठ्या प्रमाणात एसटी बस जातात व तसेच रात्रीच्या वेळेस लांब पल्ल्याच्या जवळपास महाराष्ट्रातून येणाऱ्या १५ ते २० बस या बसस्थानकावरून जातात त्यामुळे या बस स्थानकावर नेहमीच बस गाड्यांची व प्रवाशांची वर्दळ असते. परंतु सध्या या बस स्थानकावर सकाळी ठिक ६.ते रात्री १० वाजेपर्यंत वाहतूक नियंत्रक उपलब्ध असतात. त्यानंतर रात्रीच्या वेळी नळदुर्ग बस स्थानकावरती प्रवाशांच्या सेवेसाठी कोणीही कर्मचारी हजर राहत नाही. यामुळे अनेक वेळा महिला प्रवाशांना व शालेय विद्यार्थ्याला नाहक त्रास सहन करावा लागतो. तरी प्रवाशांची व विद्यार्थ्यांची मागणी आहे की या बसस्थानकावर २४ तास वाहतूक नियंत्रक ऑफिस चालू राहावे व प्रवाशांना वाहतूक नियंत्रकाची सुविधा मिळावी तसेच नळदृग व परिसरातील प्रवाशांना मुंबई, पुणे, संभाजीनगर, हैदराबाद, अक्कलकोट जाण्या-येण्याकरिता याचं बस स्थानकावर यावे लागते.या ठिकाणी आगाऊ आरक्षणाची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे प्रवाशांना सीट आरक्षणासाठी उमरगा,तुळजापूर,सोलापूर अशा ठिकाणी जावे लागते. त्यामुळे नाहक वेळ व पैसा खर्च करावा लागत आहे. तरी प्रवाशांच्या सोयीसाठी या बस स्थानकावर वाहतूक नियंत्रकाची २४.तास सेवा उपलब्ध करून या बसस्थानकावर आगाऊ आरक्षणाची सुविधा तात्काळ उपलब्ध करावी अशी मागणी लेखी निवेदनात केली आहे.

# अजित पवार यांच्या विमान अपघाताची उच्चस्तरीय चौकशी करा, लोणी भापकर गावात कडकडीत बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बारामती (पुणे) : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातानंतर त्यांच्या मृत्यूबाबत सखोल आणि पारदर्शक चौकशी व्हावी, अशी मागणी सामाजिक आणि राजकीय स्तरावर जोर धरत आहे. बारामती तालुक्यातील लोणी भापकर इथं ग्रामस्थांनी या मागणीसाठी एकदिवसीय कडकडीत बंद पाळत तीव्र आंदोलन छेडलं आहे. ग्रामस्थांनी स्पष्ट केलं की, हे आंदोलन सत्य आणि न्यायासाठीचा लोकशाही मार्गानं दिलेला इशारा आहे. अजित पवार यांच्या मृत्यूनंतर बारामतीत जनक्षोभाची ठिणगी पेटली असून, अपघाताबाबत जनतेच्या मनात मोठा संशय निर्माण झाला आहे. लोक आता संतप्त होताना दिसत आहेत. खरं तर, २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या विमान अपघातामुळे महाराष्ट्राला मोठा धक्का बसला. मात्र, घटनेनंतर काही दिवस उलटूनही अपघाताबाबत स्पष्ट माहिती समोर न आल्यानं संशयाचं वातावरण कायम आहे.

अपघाताची चौकशी व्हावी,- गावकऱ्यांची मागणी : राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अपघाताच्या चौकशीची मागणी केल्यानंतर, बारामती परिसरातील विविध गावांमधूनही आवाज उठू लागला आहे. लोणी भापकर गावानं गावबंद आंदोलन करून या मागणीला संघटित स्वरूप दिलं. अधिकृत यंत्रणांनी अपघाताचा प्राथमिक निष्कर्ष मांडला असला तरी, अनेक प्रश्न अनुत्तरित असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. आंदोलनकर्त्यांनी सांगितलं की, 'ही घटना केवळ अपघात नसून घातपात असू शकतो,' आणि म्हणून स्वतंत्र व उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली. स्थानिक तपासावर विश्वास नसल्यानं केंद्र सरकार आणि राष्ट्रपती स्तरावर चौकशी व्हावी, अशी भूमिका आंदोलनातून मांडण्यात आली. ग्रामस्थांनी ब्लॅक बॉक्समधील फ्लाइट रेकॉर्डिंग तातडीनं सार्वजनिक करण्याची मागणी केली. अपघाताच्या दिवशी अजित पवार शासकीय निवासस्थानातून निघाल्यापासूनच्या सर्व सीसीटीव्ही फुटेज, व्हिडिओ आणि छायाचित्रं जाहीर का केली जात नाहीत? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

# धार संग जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : धार संग जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मंगळवारी वार्षिक से संमेलने जो आयोजित करण्यात आले असून वार्षिक संमेलन मंगळवार दिनांक २४ /२ /२०२६ रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित केले आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि अक्कलकोटचे तालुक्याचे आमदार मा श्री सचिन दादा कल्याण शेट्टी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तरी आपल्या पाल्याचे कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यात असलेली कलागुण बघण्यासाठी या पंचक्रोशातील सर्वांनी उपस्थित राहावे असे आव्हान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धार संघ यांच्या वतीने करण्यात आले आहे.




## आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर; डेंग्यूसदृश आजाराचा धोका वाढला

# रोगराईचे संकट ! गटार तुंबल्याने रामनगर (अ) परिसरात घाणीचे साम्राज्य; परिसरातील नागरिक हैराण





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);प्रभाग क्रमांक १२७ मधील रामनगर (अ) येथील शंकर मंदिर शेजारील पाण्याच्या टाकी मागील मुख्य गटाराची अत्यंत दुरवस्था झाली आहे. हे गटार तुंबलेल्या अवस्थेत असून या गटारामधील सर्व घाणीचे पाणी मोठ्या प्रमाणावर मुख्य रस्त्यावर येत असून,येथील स्थानिक नागरिकांना तसेच शाळकरी मुलांना या तुंबलेल्या गटाराच्या पाण्यातूनच येजा करावी लागत आहे.परिणामी यामुळे स्थानिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.तसेच मोठ्या प्रमाणावर लोकवस्ती असलेल्या या परिसरातील नागरिकांचे आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे.या तुंबलेल्या गटारामुळे याठिकाणी डासांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव वाढला आहे.त्यामुळे येथील नागरिकांना डेंग्यू सदृश्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.तसेच बाजूलाच येथील संपूर्ण विभागला पाणी पुरवठा करणारी पाण्याची टाकी असून या पाण्याच्या टाकी मध्ये देखील या तुंबलेल्या गटाराचे घाणीचे पाणी जात असून यामुळे स्थानिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न याठिकाणी उद्भवत आहे.या संदर्भात स्थानिक नागरिकांच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते अँड.करण इंगवले यांनी संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाने यासंदर्भात वेळेवेळी तक्रारी केल्या तरी ही मनपा एन विभाग प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही.मनपा एन विभाग प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करून देखील ते याकडे कानाडोळा करताना दिसत आहेत.



**ॲड.करण इंगवले**

**येथील स्थानिक नागरिकांना निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींकडून फक्त विकासाची आश्वासने देण्यात आली होती,पण वास्तवात मात्र नागरिकांना याठिकाणी मोठ्या प्राणावर घाणीचा त्रास सहन करावा लागत आहे. तरी येथील स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांसाठी याठिकाणी कोणीही वाली नसल्याचे दिसत आहे.तसेच मनपा एन विभाग प्रशासनाकडून या गंभीर समस्येबाबत कोणत्याही प्रकारच्या उपाययोजना होत नसून,वारंवार तक्रारी करुन देखील त्यांच्याकडून यावर कार्यवाही शून्य कारभार होताना दिसत आहे.**

**– ॲड. करण इंगवले**

**सामाजिक कार्यकर्ता**

तरी संबंधित मनपा एन विभाग प्रशासनाकडून या तुंबलेल्या गटाराची त्वरित स्वच्छता करण्यात यावी.तसेच दुरवस्था झालेल्या या गटाराचे व्यवस्थित बांधकाम करणे देखील गरजेचे आहे.अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहे.

# नातेपुतेत विवाहितेची आत्महत्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : फलटणमध्ये गाजलेल्या डॉक्टर मुंडे यांच्या आत्महत्येप्रमाणेच सोलापूर जिल्ह्यातील नातेपुते येथे एका विवाहितेने आपल्या हातावर मजकूर लिहून आत्महत्या केल्याने खळबळ उडाली आहे. पायल रणदिवे असे मृत विवाहितेचे नाव असून ती अवघ्या २२ वर्षाची होती. या घटनेनंतर पोलिसांनी सासू-सासरे दीर आणि पती विरोधात आत्महत्येस प्रवृत्त करण्याचा गुन्हा दाखल केला आहे. पायल रणदिवे हिला ब्युटी पार्लर सुरू करायचे होते . यासाठी तिने क्लासही लावला होता. मात्र कुटुंबाने तो क्लास बंद केल्याचे दु:खही ही विवाहिता पायल रणदिवे हिने आत्महत्येपूर्वी आपल्या हातावर लिहून ठेवले होते. शनिवारी सायंकाळी घरात कोणी नसताना पायल हिने आत्महत्या केली. पायलच्या अंगावर मारहाणीचे व्रण आणि जखमांच्या खुणा असल्याने पायलच्या वडिलांनी पतीसह कुटुंबातील सासू-सासरे आणि दीर यांच्यावर शारीरिक आणि मानसिक त्रास देऊन आत्महत्येस प्रवृत्त करण्याची तक्रार दिली आहे.

पायल ही माळशिरस तालुक्यातील खुळेवाडी येथे सासरी राहत होती. आता पोलिसांनी या प्रकरणात पती शशिकांत रणदिवे याच्यासह तिचे सासू-सासरे यांना अटक केली असून पायलच्या दिराचा शोध पोलिसांकडून सुरु आहे. याप्रकरणात आता आणखी कोणती माहिती समोर येणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

पायल रणदिवे हिने आत्महत्या करण्यापूर्वी आपल्या हातावर मजकूर लिहला होता. यामध्ये तिने सासरच्या मंडळींनी आपला कसा छळ केला, हे सविस्तरपणे लिहले होते. ''हसू झालेय माझे, माझे पार्लर बंद केले .. जीव होता तो माझा.. स्वप्न होते ग .. आजपर्यंत शांत बसले पण आता नाही .. चांगल्या आई बापाची लेक आहे म्हणून निघून पण नाही गेले .. माझ्यामुळे त्रास झाला त्याच्यासाठी माफी मागते .. डजठठध'', असे पायलच्या सुसाईड नोटमध्ये लिहले आहे.